**सुट्टे (लूज) खाद्यतेल विक्री – समन्वय व धोरण समिती गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न व औषध प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: FDA-१२०१६/१३/२०२६-FDA-(AUSHADH-२)**
गो. ते.रुग्णालय आवार इमारत, ९ वा मजला, लो. टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००01
तारीख: ३०.१०.२०२६

**वाचा:-**

१. अन्न व औषध प्रशासन विभाग, शासन पत्र ई-फाईल क्र. १८३२८०५, दि. २३.०९.२०२६ (बैठकीचे इतिवृत्त).
२. अन्न व औषध प्रशासन विभाग, शासन पत्र क्र. १८३२८०५, दि. २८.०९.२०२६.
३. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे पत्र जा.क्र. असुमाका/म.बैठक/१८०३/२०२६/७, दि. १५.१०.२०२६.

**प्रस्तावना:-**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०९.२०२६ रोजी "सुट्या (लूज) खाद्यतेल विक्रीबाबत" झालेल्या बैठकीत, सुट्या खाद्यतेल विक्रीस विशेष बाब म्हणून आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतवाढ देण्याचे तसेच, प्रचलित कायदा व पारंपरिक व्यावसायिक/विक्रेते यांच्यात समन्वय साधण्यासाठी उपाययोजना सुचविण्याबाबत व पारंपरिक व्यवसाय टिकविण्यासाठी व्यावसायिकांना शासनाची मदत करण्याबाबत धोरण ठरविण्यासाठी समिती गठित करून एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने विभागाच्या संदर्भ क्र.२, येथील दि.२८.०९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये समिती गठीत करण्याच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्यांतर्गत असलेल्या नियमनातील तरतूदीचा विचार करून सदर समितीची रचना, कार्यपध्दती, कार्यकक्षा, कर्तव्ये व जबाबदारी या बाबीसह परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत अन्न सुरक्षा आयुक्त यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार, अन्न सुरक्षा आयुक्त यांनी संदर्भ क्र.३ येथील दि.१५.१०.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असून त्यानुसार ‘सुट्टे (लूज) खाद्यतेल विक्री – समन्वय व धोरण समिती" गठीत करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

सुट्टे (लूज) खाद्यतेल विक्रीबाबत प्रचलित कायदा व पारंपरिक व्यावसायिक/विक्रेते यांच्यात समन्वय साधण्यासाठी तसेच पारंपरिक व्यवसाय टिकविण्यासाठी धोरण ठरविण्याकरिता खालीलप्रमाणे "सुट्टे (लूज) खाद्यतेल विक्री – समन्वय व धोरण समिती" गठीत करण्यात येत आहे.

**समितीची रचना :-**

| अ.क्र. | समितीची रचना | पदनाम |
|---|---|---|
| १. | सह आयुक्त (अन्न), छत्रपती संभाजीनगर, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | सह आयुक्त (अन्न), अमरावती, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३. | अध्यक्ष, खाद्यतेल व्यापारी असोसिएशन, महाराष्ट्र राज्य | अशासकीय सदस्य |
| ४. | अध्यक्ष, खाद्यतेल मर्चंट असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर | अशासकीय सदस्य |
| ५. | पारंपारिक तेली समाजाचे प्रतिनिधी | अशासकीय सदस्य |
| ६. | अन्न तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ | तज्ज्ञ सदस्य |
| ७. | सहायक आयुक्त (अन्न), मुख्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य | सदस्य सचिव |
| ८. | अध्यक्षांच्या मान्यतेने आवश्यकतेनुसार इतर अधिकारी/तज्ज्ञ | निमंत्रित सदस्य |

२. समितीची कार्यकक्षा :-

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :

१. कायदेशीर तरतुदी व अडचणींचा अभ्यास : सुट्या खाद्यतेल विक्रीबाबत अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्यांतर्गत नियम/विनियमांतील तरतुदी आणि पारंपरिक व्यावसायिक/विक्रेते यांच्या प्रत्यक्ष व्यावहारिक अडचणी यांचा अभ्यास करणे.

२. समन्वयासाठी उपाययोजना : प्रचलित कायदा व पारंपरिक व्यावसायिक/विक्रेते यांच्यात समन्वय साधण्यासाठी व्यवहार्य उपाययोजना सुचविणे.

३. धोरणात्मक शिफारशी : पारंपरिक व्यवसाय टिकविण्यासाठी व्यावसायिकांना शासनाची मदत करण्याबाबत धोरणात्मक शिफारशी करणे.

समिती ही शिफारशी करणारी (सल्लागार) समिती असून कायदा/विनियमांबाहेर सूट देण्याचे अधिकार तिला असणार नाहीत.

३. समितीची बैठक व अहवाल :- समितीची बैठक आवश्यकतेनुसार अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे होईल. तसेच, अध्यक्ष यांना आवश्यकतेनुसार इतर अधिकारी/तज्ञ यांना बैठकीस निमंत्रित करता येईल. सदर समितीने आपला अहवाल एक महिन्यात शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०३०१४४४१०७०५५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2026.10.30 17:12:32 +05'30'

**(गणेश गायकवाड)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, अन्न व औषध प्रशासन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य), वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई
५. सह आयुक्त (अन्न), संभाजीनगर / अमरावती.
६. सहायक आयुक्त (अन्न), मुख्यालय, अन्न व औषध प्रशासन, मुंबई.
७. समितीचे सर्व सदस्य.
८. निवड नस्ती (औषधे-२).